# इंडियन् म्युझिक् सोसायटी ऑफ् सेंट्रल् इलिनॉय्

ब्लूमिंग्टन् आणि नॉर्मल् ही मध्यवर्ती इलिनॉय् मधली लाखभर वस्तीची जुळी गावं. २००० साली येथे बरीच मराठी मंडळी आली. त्यातील संगीताची आवड असलेले काहीजण गाण्यांचे लहान मोठे कार्यक्रम करत होते. अशाच काही मंडळींनी एकत्र येऊन २००७ मधे इंडियन् म्युझिक् सोसायटी ऑफ् सेंट्रल् इलिनॉय् (IMS) ची स्थापना केली. नामवंत कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करून भारतीय शास्त्रीय संगीताचा स्थानिक लोकांना परिचय करून देणे व स्थानिक लोकांना शास्त्रीय व उपशास्त्रीय गायन वादनाची संधी उपलब्ध करुन देणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

गेल्या ५ वर्षात या संस्थेतर्फे आरती अंकलीकर, राहूल देशपांडे संजीव अभ्यंकर, पं. नागराज हवालदार, एल. के. पंडित, डॉ. विकास कशाळकर, शौनक अभिषेकी, पं. विजय सरदेशमुख अशा ख्यातनाम कलाकारांचे गायनाचे तसेच संतूर, (धनंजय दैठणकर) – सरोद, (केन झुकरमन) – बासरी, (दीपक राम ) – जलतरंग, (मिलींद तुळाणकर) – व्हायोलिन, (कला रामनाथ) – तबला, (रामदास पळसुले) – सतार (शाहिद परवेझ) अशा दिग्गज कलाकारांचे वादनाचे कार्यक्रम झाले. अशा प्रतिथयश कलाकारांमुळे आणि संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमांमुळे भारतीय शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमांना भारतीयांबरोबरच अमेरिकन लोकांचीही उपस्थिती वाढते आहे.

शास्त्रीय संगीत समजत नाही म्हणून आवडत नाही, अशा लोकांसाठी अधूनमधून रागावर आधारित गाण्याचे कार्यक्रमही केले जातात. हे कार्यक्रम स्थानिक कलाकार सादर करतात. आलेल्या कलाकारांच्या कार्यशाळा आयोजित केल्या जातात. असाच एक उपक्रम म्हणून "रागा अनव्हेल्ड" हा माहितीपटही दाखवण्यात आला. या प्रसंगी माहितीपटाच्या निर्मात्या गीता देसाई यांनी स्वतः उपस्थित राहून प्रेक्षकांना चित्रीकरणाच्या वेळचे रोचक प्रसंग सांगून त्यांच्या प्रश्नांना उत्तरेही दिली.

IMS च्या कार्यक्रमातील सातत्यामुळे हळूहळू गावातील लहान मुले शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेउ लागली आहेत. काही मंडळी स्काईप सारख्या आधुनिक तंत्राचा वापर करून भारतातून शिक्षण घेत आहेत. या तंत्रामुळे गांधर्व महाविद्यालयातून शिक्षण घेऊन परिक्षा देणे हा मार्गही उपलब्ध झाला आहे. शास्त्रीय संगीत शिकणाऱ्यांना आपली कला सादर करता यावी यासाठी दरवर्षी होणारा "प्रतिमा" हा कार्यक्रम विशेष उल्लेखनीय. यात शक्यतो गाणे व साथ दोन्ही शिकणाऱ्यांनीच करावे असा आग्रह केला जातो. अशा उपक्रमांमुळे मुलांबरोबर पालकही शास्त्रीय संगीतात रस घेउ लागले आहेत ही अतिशय समाधानाची गोष्ट आहे.

डॉ. उदय देउस्कर (संस्थापक), प्रसन्न माटे (अध्यक्ष), समीर बिल्दीकर, मानसी जोशी, मनप्रीत बेदी, हे संगीतप्रेमी संस्थेच्या सुरुवातीपासून कार्यरत आहेत. त्यांना इतरही स्वयंसेवकांची वेळोवेळी मदत असतेच. या सर्वांच्या मेहनतीचे फळ आता दिसू लागले आहे. संस्थेची वेबसाईट तयार करणे, दर वेळेस विषयानुरूप फ्लायर तयार करणे, सूर–ताल सारख्यापत्रकातून माहिती देणे, ध्वनी– संयोजनाची उत्तम व्यवस्था करून कार्यक्रम सुश्राव्य करणे, आणि हो, गरज पडली तर बाहेरून आलेल्या कलाकारांना साथ करणे अशी सर्व कामे ही मंडळी गेली ५ वर्षे मनापासून करत आहेत. यातील बहुतेक मंडळी भारतातून शास्त्रीय संगीताचे ऑनलाइन शिक्षण घेत आहेत.

IMSच्या अशा प्रयत्नांमुळे भारतापासून हजारो मैल दूर असलेल्या सेंट्रल् इलिनॉयच्या या प्रदेशात थोडेफार कानसेन तरी नक्की तयार होतील अशी खात्री वाटते.

**माधुरी माटे** (ब्लूमिंग्टन्)

(टीप: अधिक माहितीसाठी, http://www.indianmusicsociety.org तसेच फेसबुकवरही (IMS Bloomington) आम्हाला जरुर भेटा. हे वर्ष शिक्षण या थीम वर आधारित आहे.)